# बा. द. सातोस्कर : गत गोव्याचे साक्षेपी बखरदार



- डॉ. बाळकृष्णजी कानोळकर
फोंडा, गोवा.

**बा.** द. सातोस्करांना उभा गोवा ' दादा ' सातोस्कर या नावाने ओळखतो. ते आज हयात नाहीत. गेल्या शतकाच्या पहिल्या दशकात त्यांचा जन्म झाला. (२६ मार्च १९०९). ९२ वर्षांचे दीर्घ आयुष्य त्यांच्या वाट्याला आले. त्यापैकी सुमारे अर्धी वर्षे ते मुंबईत होते. मुंबईत असताना त्यांचा अनेक व्यक्ती आणि संस्थांशी संबंध आला. ' भारतीय संस्कृतीकोश ' कार पंडीत महादेवशास्त्री जोशी त्यांचे जवळचे मित्र होते. सातोस्करांचे मुंबईतले निवासस्थान ' १४, त्रिभुवन रोड हे माझे दुसरे माहेरच होते.' असे त्यांनी आपल्या एका लेखात लिहिले आहे. माझ्या दृष्टीने ही बाब अत्यंत लक्षणीय अशाकरीता आहे, की शास्त्रीबुवा जसे संस्कृती कोशकार होते तसेच त्यांचा हा मित्र गत गोमंतकाच्या सामाजिक - सांस्कृतिक जीवनाचा साक्षेपी बखरदार आहे. हे मी इ प्रामुख्याने नोंदवू इच्छितो. मुंबईत, महाराष्ट्रात तसेच गोव्यातही सातोस्करांचा अनेक व्यक्ती, संस्था व सांस्कृतिक, भाषिक, साहित्य चळवळीशी जवळून संबंध आला. अशा अनेक चळवळींमध्ये ते


सक्रिय होते. गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या निर्वासित कालखंडात तर ते त्याचे प्रमुख आधारस्तंभ होते. समाजाच्या विविध भागांत, विविध स्तरांमध्ये त्यांचा संचार होता. त्यांचे निरीक्षण तेज होते. अनेकानेक भलेबुरे अनुभव घेऊन जीवन अनुभव संपन्न झालेले होते. जोडीला प्रकाशन व्यवसाय, पत्रकारिता यामुळे अनुभव आणि ज्ञानात भरच पडलेली होती. ते सुविद्य तर होतेच. शिवाय चांगले वाचक होते. बहुभाषिक होते. तसेच बहुश्रुतही होते. ' केल्याने देशाटण, पंडितमैत्री सभेत संचार ! शास्त्रग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार!' या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या एकूणच व्यक्तीमत्वामधून सहजच येतो. ते चतूर होते, माणूसप्रिय होते, स्नेहाळ होते आणि विशेष म्हणजे गुणीजनांशी ते सदैव मैत्री राखून होते.

गोव्यात परत आल्यावर (१९६२) त्यांनी ललित लेखनाला प्रारंभ केला. त्यातून जाई, मेनका, अनुपमा, आज मुक्त चांदणे (दोन खंड) ' इत्यादी कादंबऱ्या, ' प्रितीची रीत व इतर कथा ' व 'अभुक्ता ' हे कथासंग्रह, ' शांग्रीला ' हा ललित निबंधांचा संग्रह, 'इथे देवांची वसती ' ही प्रवासवर्णनात्मक कृती इत्यादी पुस्तकांची निर्मिती झाली . याशिवाय ' बादसायन ' हे आत्मचरित्र, 'श्रद्धांजली' हा मृत्युलेखांचा संग्रह, ' गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार ' आणि ' गोमंतकीय मराठी साहित्याचे आधुनिक शिल्पकार' , ' स्मरण ज्येष्ठांचे ' व ' स्मरण स्नेह्यांचे ' अशा दोन भागात विभागलेला ' स्मरण ' हा ग्रंथ. ही त्यांची साहित्य संपदा या लेखाच्या दृष्टीने महत्वाचा दस्तऐवज ठरणारी आहे. पुढे वयाच्या सत्तरीत गोमंतकाच्या सांस्कृतिक इतिहास लेखनाविषयीचा (पंचखंडात्मक) त्यांनी केलेला संकल्प त्यांच्या असीम गोमंतभक्तीची, अवीट ज्ञानलालसेचे, दीर्घोद्योगी वृत्तीची, चिवट चिवाटीची आणि अविरत कार्यरत राहण्याच्या दृढसंकल्पाची चालती बोलती निशाणी आहे. संकल्पित पाच खंडापैकी पहिले तीन खंड ते पूर्ण करु शकले. प्रामुख्याने त्यांतूनच त्यांच्यामधील गोमंतकाचा (कालच्या गोमंतकाचा असे आज म्हणावे लागेल) साक्षेपी बखरदार आपणास दृष्टीस पडतो, अनुभवण्यास येतो.

उपनिर्दिष्टीत सर्वच ग्रंथांमधून त्यांनी आपली ही बखरकाराची भूमिका साक्षेपाने, प्रामाणिकपणे आणि जिव्हाळ्याने निभावलेली आहे. ती कुठेच तर्ककठोर वा वाचाकर्कश त्यांनी होऊ दिली नाही. हा त्यांचा विशेष गुण म्हणावा लागेल. ' गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'च्या ' अर्वाचीन गोव्याचा इतिहास ' या १९८७ साली प्रकाशित झालेल्या तिसऱ्या ग्रंथात ' लेखकाचे निवेदन ' यामध्ये ते लिहितात की, ' सर्वसामान्य वाचकांसाठी हे ग्रंथलेखन करत असल्यामुळे धोपट मार्गाने जाणे मला भाग होते. म्हणूनच इतिहासलेखनाचे सारे आधुनिक संकेत व पद्धती बाजूला ठेवून अगदी पारंपरीक पद्धतीने गोव्याच्या इतिहासाचे दोन खंड शक्यतो तटस्थपणे मी लिहिले आहेत. '

उपरोल्लेखित सर्वच ग्रंथांतून सातोस्करांनी गोमंतकीय जनजीवनाचा व इतिहासाचा ओघवता चलचित्रपटच वाचकांच्या दृष्टीसमोर साकार केलेला आहे. तोही रसाळपणे. एका बखरदाराच्या शैलीत बखरकार हा आपला नेता, वीरपुरुष, प्रदेश, धर्म, संस्कृती, इतिहास याला बांधलेला असतो, त्याविषयी त्याला ममत्त्व असते, जिव्हाळा असतो, अभिमान असतो आणि तत्संबंधाने कृतज्ञतेची भावनाही त्यांच्या मनीमानसी जागृत असते. याच प्रकारचा अनुभव सातोस्करांचे हे सारेच लेखन वाचताना आल्याविना राहत नाही आणि म्हणूनच मला ते गत गोमंतकाचे बखरकार वाटतात. पुढील अल्प पण आवश्यक विवेचनावरुन वाचकही माझ्या मताशी सहमत होतील अशी मी आशा बाळगतो.

सातोस्करांनी गोमंतकाच्या इतिहासाचा जो त्रिखंडात्मक प्रकल्प सिद्ध केला त्यामधून त्यांनी गत गोमंतकाच्या भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे बरेचसे वास्तव चित्रण केलेले असले तरी त्यातूनही त्यांचा गोष्टीवेल्हाळपणा, गप्पीष्ठ स्वभाव व बहुश्रुतता यांचे दर्शन घडल्याशिवाय राहात नाही. प्राचार्य गोपाळराव मयेकरांनी त्यांच्याविषयी जे लिहिले आहे ते खरेच आहे. ते लिहितात, ' गोमंतकाच्या संस्कृतीचा, इतिहासाचा, स्वातंत्र्यलढ्याचा, सामाजिक चळवळींचा, भाषिक स्थित्यंराचा, साहित्यिक प्रवाहांचा, बदलत्या राजकारणाचा आणि स्वातंत्र्योत्तर सर्वांगिण घडामोडींचा चालता बोलता ज्ञानकोष म्हणून सार्थपणे त्यांच्यावडे समग्र गोमंतकच नव्हे, तर सारा महाराष्ट्र



कारवार येथील संमेलनप्रसंगी पुढील रांगेत जनाप्पा कामत, ॲड. सुशिल कवळेकर, ज. र. करंदीकर, अ. का. प्रियोळकर, डॉ. व्यं. म. कैकीणी, मामा वरेरकर, बा. द. सातोस्कर आदी

आणि देशही पहात होते.' परंतु आपल्या या लेखनाबद्दल दस्तुरखुद्द सातोस्करांनी जे लिहून ठेवले आहे तेही कुणी नजरेआड करु शकत नाही. आणि म्हणूनच त्यांच्या सत्कार समारंभानिमित्ताने व्यक्त केलेल्या आपल्या मनोगतात प्रा. वसंत दावतार म्हणतात की, 'यात इतकी माहिती ग्रंथीत झालेली आहे की, या ग्रंथाच्या वाचनाने (त्यांच्या) सर्वसामान्याला प्रगल्भ व्यक्तीमत्व प्राप्त होईल. पुन्हा ही केवळ माहिती नाही. ज्ञान, संशोधन, चिकित्सा यांचे हे भांडार आहे. शिवाय एक लक्षणीय गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, ती म्हणजे दंतकथाही इतिहास जाणण्यास पूरक ठरतात. या आधुनिक विचारांची जाण सातोस्करांनी बाळगली आहे. दंतकथामधून इतिहास कसा अन्वित करता येईल याचे एक शास्त्रच आज बनलेले आहे. काही दंतकथातील तथ्य स्विकारता येते, तर काही त्याज्य ठरतात, हे त्यांच्या विश्लेषणातून ठरते याची जाण श्रीमान सातोस्करांनी या लेखनातून प्रत्ययाला आणून दिलेली आहे.'

'गोमंतक : प्रकृती व संस्कृती' या त्रिखंडात्मक प्रकल्पाचा पहिला खंड १९७९ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याला कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची छोटीशी प्रस्तावना लाभलेली आहे. त्यात ते म्हणतात की, 'सांस्कृतिक मानवशास्त्राच्या विद्यार्थ्यांना अध्ययनार्थ लागणारी समग्र सामग्री या ग्रंथात उपलब्ध होते.'

या प्रकल्पाचा दुसरा खंड 'प्राचीन व मध्ययुगीन गोव्याचा इतिहास' १९८२ मध्ये प्रकाशित झाला. त्याला सुप्रसिद्ध इतिहास संशोधक आणि गोवा पुराभिलेख पुरातत्व व संग्रहालयाचे माजी संचालक कै. डॉ. वि. त्र्यं. गुणे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते लिहितात, 'श्री सातोस्कर यांना इतिहास संशोधनातील

बारकावे ज्ञात आहेत. परंतु या ग्रंथाचा विस्तार त्यांनी संशोधनाऐवजी निवेदन-संकलनाच्या भूमिकेतून केला आहे. अशा प्रकारे त्यांनी आजपर्यंत गोव्याविषयी लिहिल्या गेलेल्या सर्व ग्रंथकारांच्या मतांचा मागोवा घेत घेत आपली गोमंतकाची इमारत उभारली आहे. गेल्या सुमारे अडीच हजार वर्षांतील गोमंतकाचे चित्र त्यांनी वाचकांपुढे उभे केले आहे. त्यांच्या या लेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ऐतिहासिक घटनांचे विवेचन करताना कोठेही आग्रही भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे भावी संशोधकांना गोमंतकाच्या या राजकीय इतिहासाचा उपयोग एका विश्वासार्ह संदर्भ ग्रंथासारखा होणार आहे.'

त्यांचा 'अर्वाचीन गोव्याचा इतिहास' हा तिसरा खंड १९८७ मध्ये प्रकाशित झाला. कै. ना.ग . उर्फ नानासाहेब गोरे यांनी मार्मिक प्रस्तावना त्याला लिहिलेली आहे. गोव्याच्या अर्वाची इतिहासाच्या हुडकून काढता येतील तेवढ्या सर्व पाऊलखुणा हुडकण्याचा स्तुत्य प्रयत्न सातोस्करांनी त्यात कसोशीने केलेला दिसून येतो. परंतु या इतिहासातील 'घटनाक्रमांची ऐतिहासिक दृष्टीने जेवढी चर्चा श्री सातोस्करांनी करावयास हवी होती, तेवढी केलेली नाही.' असे नमूद करुन आणखी एका महत्वाच्या मुद्यावर गोरेंनी नेमके बोट ठेवले आहे. ते लिहितात, 'श्री सातोस्करांनी डॉयन्बीसारखा इतिहासाचा व्यापक दृष्टीकोन ठेवून गोमंतकाचा इतिहास लिहिला असता, तर त्यांना असे आढळून आले असते की, गेल्या दीड-दोन हजार वर्षांत भारताची जी प्रधान संस्कृती म्हणजे हिंदू संस्कृती, तिच्यातील जे दोष, तिची जी पिछेहाट, तिच्यातील जो विस्कळीतपणा, तेच दोष, तीच पिछेहाट व तोच विस्कळीतपणा गोमंतकीय समाजातही दिसून येतो, तसेच या त्रिदोषांमुळे परवशतेचा जो रोग भारताला जडला, त्याला गोमंतकही अपवाद ठरु शकणार नाही. म्हणून जेव्हा भारताला राष्ट्रीयत्वाची नवी दृष्टी प्राप्त झाली, तेव्हाच गोव्याला दास्याचे भान आले आणि मुक्तताही झाली. म्हणूनच हा केवळ योगायोग ठरत नाही! तर ती एक अपरिहार्यता ठरते.'

गोव्यातील गौड सारस्वत ब्राह्मण (परशुराम मिथकाचा) आपले श्रेष्ठत्व मिरविण्यासाठी मोठा आधार घेतात. त्यावर भाष्य करताना सातोस्कर लिहितात, "परशुरामाने सारस्वत ब्राह्मणांना यज्ञकार्यार्थ गोव्यात आणले व या सारस्वतांनी मंगेश, शांतादुर्गा, रामनाथ, नागेश, दामोदर आदी आपल्या कुलदेवतांना आपल्या बरोबर इकडे आणले. अशा तऱ्हेचा एक समज गोव्यातील लोकमानसांत आणि मुख्यतः सारस्वतांमध्ये पक्केपणाने रुढ आहे. परंतु ही समजूत चूक आहे. परशुरामकाळात आर्यांत वर्ण व्यवस्था होती. जातीव्यवस्था नव्हती. तर मग परशुरामाने आणलेले ब्राह्मण हे पंचगौडांतर्गत सारस्वत नावाच्या विशिष्ट जातीचे कसे ठरतील ? दुसरे, परशुरामकालीन आर्यांची संस्कृती यज्ञप्रधान होती. द्रविडांकडून दैवत कल्पना स्विकारण्याचा काळ पुढे येणार होता. अशावेळी सारस्वतांनी गोव्यात देवदेवता आणल्या ही कल्पना चुकीची वाटते. तिसरी गोष्ट, आर्यांच्या आर्थिकीकरणाच्या पद्धतीची. ही पद्धत पाहिली तर गोव्यात वसाहतीसाठी प्रथम फक्त आर्य ब्राह्मणच आले हे पटत नाही. प्रथम आर्येतर टोळ्यांनी गोव्याचे वसाहतीकरण केले, शेती केली, सयोनिलिंगाची व मातृदेवतेची कल्पना आणली व त्यानंतर द्रविडांनी मूर्तीपूजा आणली आणि नंतर आर्य ब्राह्मणच नव्हे तर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हेही वसतीसाठी गोव्यात आले ही शक्यता मला अधिक वाटते."

सातोस्करांच्या वरील युक्तवादांत तथ्यांश असला तरी सातोस्कर तत्संबंधाने म्हणावे तितके प्रामाणिक दिसत नाहीत. आणि म्हणूनच त्यांच्या या खंडाची चिकित्सा करताना इतिहास तज्ञ डॉ. प्रकाशचंद पां. शिरोडकरांनी जे मत नोंदवलेले आहे ते मला अधिक विश्वसनीय वाटते. ते लिहितात, 'म्हणजे एका बाजूला परशुराम दंतकथा थोतांड म्हणायचे व दुसऱ्या बाजूला त्यात तथ्य आहे असे मानायचे. त्यामुळे वाचकाला ग्रंथकार गोंधळलेल्या स्थितीत असल्याचे जाणवते. कधी कधी 'दादा गोष्टी सांगतात चार युक्तीच्या' अशा शंकेची पाल मनात चुकचुकत राहते.'

या संदर्भात लेखकाच्या निवेदनात सातोस्करांनी जी मते मांडलेली आहेत ते म्हणूनच विचार ठरतात. ते लिहितात, 'प्रस्तुतचा ग्रंथ (खंड १) हा सुद्धा संशोधन स्वरुपाचा ग्रंथ नाही. संकलनावर, माहितीवर त्याचा अधिक भर आहे. सत्तरीतील एका वृद्धाने केलेले हे शोधन आहे. ते संशोधन नव्हे.' पुढे ते लिहितात की, 'जे आधार

आहेत ते सर्वच प्रत्यक्ष गोव्याबद्दलचे नसून कोकण, कर्नाटक व महाराष्ट्राबद्दलचे आहेत व या अनुमानांच्याद्वारे गोव्याच्या प्राचीन सामाजिक घडणीच्या इतिहासावर प्रकाश पाडायचा आहे. हे करत असताना काही अनुमाने चुकली किंवा निष्कर्ष चुकीचे वाटले तर ते दुरुस्त करण्याची जबाबदारी भावी पिढीतील तज्ञ पत्करतील अशा विश्वासाने हे जटिल (गोव्याच्या प्राक्कालीन वसाहती संबंधीचे) प्रकरण मी हाताळत आहे.'

आपल्या लेखनासंबंधाने, आपल्या निवेदन पद्धतीत कालानुक्रम असला तरी काही खास अशी शिस्त व 'मेथड' नाही. असे म्हणणारे दादाच या संदर्भात चातुर्याने बगल देवून असेही म्हणतात की, 'टॉयन्बीप्रमाणे गोव्याकडे पहायचे म्हटले तर गोव्याची म्हणून स्वतंत्र संस्कृती असावसाद नको का? पण गोवा हा प्राचीन काळी भारत होता, पोर्तुगीज काळातही होता आणि यापुढे ही राहणार आहे.' त्यांच्या या प्रकारच्या दुभंगलेल्या, गोंधळलेल्या मतप्रदर्शनाला काय म्हणावे ? तेच कळत नाही. हे असे का झाले असावे, याचा शोध घेतला तर असे जाणवते की, सोयिस्कर ठिकाणी त्यांनी दंतकथांचा आधार घेतलेला आहे. त्यांनी त्यासंबंधाने कबुलीही देवून ठेवलेली आहे. ते लिहितात, 'ही घटी ते वाचकांच्या समोर ठेताना एक ज्यादा गोष्ट मी केली आहे. ती म्हणजे ठिकठिकाणी काही दंतकथा पेरल्या आहेत. दंतकथांना इतिहासात स्थान नाही, असे काही विद्वानांचे म्हणणे आहे. मला ते पटत नाही. दंतकथा या सत्यकाश नसतात, हे खरे; पण त्यात तथ्य मात्र जरुर असते. काही प्रमाणात इतिहासातील घटितांची निश्चिती या दंतकथांमुळेही होऊ शकते. म्हणून दंतकथा या इतिहासाला मारक नसून पूरक आहेत असे मी मानतो.' परंतु दादा इथे एक बाब विसरतात की, प्रस्तुत दंतकथेला ऐतिहासिक पुराव्याचा आधार असावा लागतो; नपेक्षा ती एक 'गप्प' ठरते. अशीच एक 'गप्प' त्यांनीच 'गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार' या आपल्या ग्रंथात वासुदेव देशप्रभू या लेखकाच्या संबंधाने लिहिताना ठेवून दिलेली आहे. देशप्रभूंना 'रावराजे' हा किताब कोल्हापूरच्या भोसलेंनी दिला. तसेच त्यांच्या सन्मानार्थ संस्थानातून देशप्रभूना एक हत्तीण भेट देण्यात आलेली होती, असे ते लिहून जातात. परंतु 'रावराजे' असा किताब प्रत्यक्षात कोल्हापूर संस्थानात अस्तित्वात



तरी होता का याची खातरजमा ते करत नाहीत.

या प्रकल्पाच्या आपल्या दुसऱ्या खंडाच्या लेखनादरम्यान आपल्या या दंतकथा प्रचुर लिखाणाचा अतिरेक त्यांना जाणवला असावा. त्यांत ते लिहितात, ' सनपूर्व २५०० वर्षापूर्वी परशुरामाने गोव्याच्या आकीकरणास प्रारंभ केला. याचा अर्थ हाच की त्याहीपूर्वी गोव्यात माणसे होती. परशुरामापूर्वी ५००० वर्षापूर्वी कोल, गावडे, नाग इ. आर्येतर जमाती गोव्यात येऊन स्थिर झाल्या होत्या. त्यांचा मग शुद्रात समावेश करण्यात आला. सारस्वतांनीच देवदेवता गोव्यात आणल्या हे विधान म्हणजे एक थोतांड आहे. प्रोटो ऑस्ट्रॉलॉइड व द्रविड वंशीय अनार्य लोकांच्या लिंग व मातृदेवता आर्यांनी आपल्या दैवविश्वात सामावून घेतल्या हे सत्य आहे. म्हणूनच अलीकडील पोर्तुगीज राजवटीतले अर्वाचीन पुरावे देऊन गोव्यातील प्राचीन दैवतविश्वाबद्दल लिहणे हे मला अनैतिहासिक वाटते.'

सातोस्कर हे इतिहासतज्ञ नव्हेत. गोमंतभूमी आणि तिथली माणसे व संस्कृती याच्या ममत्वापोटी, जिव्हाळ्यापोटी त्यांनी जो इतिहास लिहिला आहे तो पूर्णांशाने वास्तव इतिहास म्हणता येणार नाही. तसे ते आवश्यक ते पुरावे उद्धृत करीत नाहीत. सर्व साधारणपणे इतिहास लेखनाच्या दृष्टीने जे महत्व बखरवाङ्मयाला असते तितकेच आणि तेवढेच महत्व त्यांच्या या लेखनाला द्यावे लागेल. बखरकार हा इतिहासकार नसतो, तो त्या काळाचा एक कानआणि डोळे उघडे असलेला बुहुश्रुत माणूस असतो. मात्र तो विविध अभिनिवेशापासून अलिप्त राहू शकत नाही, याचे भान सतत बाळगावे लागते.

वरील त्रिखंडात्मक प्रकल्पाशिवाय सातोस्करांनी जे ललित लेखन केलेले आहे त्यातही त्यांनी गत कालच्या गोमंतकाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे व एकूणच स्थितीगतीचे रोचक चित्रण केलेले आहे. त्यातील घटिते, पात्रे, प्रसंग हे त्यांनी विविध गोष्टी, दंतकथा, आख्यायिका यांच्या सहाय्याने सजवलेल्या, मढवलल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातील पात्रे म्हणजे त्यांनी स्वकालीन व गतकालीन प्रत्यक्षांतल्या एकापेक्षा अधिक वास्तव व्यक्तीमत्वाचे व व्यक्तीचे केलेले सुरेख व प्रत्ययकारी असे ब्लेडींग आहे. त्यातील घटना प्रसंगातही काही प्रमाणात हेच तत्व लागू पडते. असे जरी असले तरी हे लिखाण ललित असल्याने त्यांना ते क्षम्य आहे. परंतु त्यातूनही त्यांच्यातल्या बखरकाराचे दर्शन झाल्याविना राहात नाही. 'जाई', 'आज मुक्त चांदणे', 'येथे देवाची वसती' या त्यांच्या कृतीतून याचा प्रामुख्याने प्राचुर्याने अनुभव येतो.

त्यांनी लिहिलेल्या 'स्मरण' आणि 'श्रद्धांजली' या ग्रंथातूनही गत गोमंतकातील अनेकानेक व्यक्तींचा व त्यांच्या कार्याचा त्याचप्रमाणे तत्कालीन समाजजीवनाचा चांगला परिचय होण्यास मदतच होते. परंतु तोही इतिहास नव्हे. त्यातही सातोस्कर बऱ्याच ठिकाणी 'आत्मप्रौढी' व 'गप्पीष्ठपणा' या दोषांना बळी पडलेले दिसतात.

गोमंतकीय मराठी साहित्य हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. त्यातील साहित्यिक संबंधाने त्यांनी जे लेख लिहिले ते सारेच ग्रंथरुपात येण्यापूर्वी 'दै. गोमंतक' च्या रविवारच्या पुरवणीमधून प्रकाशित झालेले होते. ते सर्वसामान्य वाचकांकरिता लिहिलेले होते. त्यातून त्यांनी पुढे दोन ग्रंथ सिद्ध केले. एका मर्यादेपर्यंत या ग्रंथांना संदर्भमूल्य जरुर आहे परंतु ते वादातीत नाही. या दृष्टीने पाहू जाता त्यांचे हे दोन्ही ग्रंथही काहीशे बखरवाङ्मयाच्या वाटेनेच जाणारे ठरतात.

राहता राहिले त्यांचे आत्मचरित्र 'बादसायन'. कोणतेही आत्मचरित्र कधीच अभिनिवेशविरहीत असूच शकत नाही. तेव्हा त्याला ऐतिहासिक दस्तऐवजाचा दर्जा देता येत नसतो. त्यातील घटिते व प्रसंग इतर दस्तऐवजानी ताडून पहावी लागतात. (सत्याच्या कसोटीवर) खरी उतरली तर ती स्विकारावी लागतात. आणि म्हणून ती व्यक्ती वा त्याच्या समकालाचा इतिहास ठरु शकत नाही. त्यांच्या आत्मचरित्रासंबंधात कै. सुरेश वाळीम्बे यांनी जे लिहून ठेवले आहे. ते म्हणूनच अत्यंत चिंतनीय व विचार करावयास लावणारे आहे. ते लिहितात, त्यांनी स्वतः प्रथम लिहिलेले आत्मचरित्र खूप मोठे झाले म्हणून प्रकाशकांच्या सूचनेवरुन ते संक्षिप्त करण्याचे काम मी केले. नंतर प्रकाशकांचा विचार पुन्हा बदलल्याने नवीन विस्तृत स्वरुपात ते लिहिण्याचे काम सातोस्करांच्या बरोबरीने मी केले. आत्मचरित्रात आलेल्या, पण त्यांच्या आयुष्यात घडलेल्या किती तरी घटना त्यांनी मला मोकळेपणाने सांगितल्या. इतकेच नव्हे तर साहित्य लेखनासाठी त्यांचा वापर करण्याची परवानगी त्यांनी मुक्तहस्ताने दिली. 'नाती नियतीची' ही माझी कादंबरी म्हणजे सातोस्कर यांच्याच आयुष्यात घडलेल्या आणि 'बादसायन' मध्ये अतिशय संक्षिप्तपणे उल्लेख आलेल्या 'कल्याणी प्रकरणा' चे साहित्यरुप आहे, हे इथे सांगायला मला मुळीच संकोच वाटत नाही.'

माझ्या स्मरणानुसार सातोस्करांचे हे आत्मचरित्र 'तरुण भारत' दैनिकाच्या रविवारच्या पुरवणीतून 'बादसायन' याच नावाने क्रमशः पूर्वी प्रकाशित झालेले होते. ललित लेखक व शास्त्रीय लेखक अशी परस्पर विरोधी ध्रुवांवरची त्यांची लेखनप्रवृत्ती आहे. त्यात ते काही प्रमाणात यशस्वीही झालेले आहेत. गत शतकातल्या गोमंतकीय जनजीवनाचे बरेवाईट चित्र, त्यांचे संदर्भ त्यांच्या लेखनातून प्राचुर्याने विखुरलेले आहेत. खरे तर एका स्वतंत्र अभ्यासाचा हा विषय आहे. असे असले तरी अगदी नेमकेपणाने व तटस्थपणे सांगायचे झाले तर तरीही त्यांना गत गोमंतकाचा इतिहासकार म्हणता येणार नाही. (जसे त्यांचे काही भाऊबंद व चाहते समजतात.) झालेच तर त्यांना गत गोमंतकाचे साक्षेपी बखरकार म्हणता येईल. आणि तेच मला वाटते त्यांच्या साहित्याचे यथार्थ मूल्यमापनही ठरावे.

* * *